लोकमत

# ऑनलाईन परीक्षा गुरुवारपासून

## शिवाजी विद्यापीठाकडून वेळापत्रक : पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा देण्यासाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शिवाजी विद्यापीठाकडून गुरुवार (दि. १५) पासून सुरू होणार आहेत. त्याचे सुधारित वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले आहे.

विद्यापीठाने दि. २२ मार्चपासून हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू केल्या. मात्र, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने दि. ६ ते १२ एप्रिल या कालावधीतील परीक्षा स्थगित केल्या. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सुमारे ५४ हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा देण्याचा पर्याय निवडला होता. कोरोनामुळे या परीक्षा ऑनलाईन स्वरूपात घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यासह ऑफलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा देण्याचा पर्याय निवडावा, असे आवाहन केले. त्यानुसार काही विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पर्याय निवडला आहे. हा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा गुरुवारपासून होणार आहे.

ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर स्वतंत्रपणे जाहीर केले जाणार आहे, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

### ऑनलाईन परीक्षेसाठी ९८ हजार विद्यार्थी

विद्यापीठाने परीक्षा स्थगित करण्यापूर्वी ऑफलाईन परीक्षा देण्यासाठी ५४ हजार विद्यार्थ्यांनी पर्याय निवडला होता. विद्यापीठाने पर्याय बदलण्याचे आवाहन केल्यानंतर गेल्या आठवड्यात ३७ हजार जणांनी पर्याय बदलला आहे. त्यामुळे यापूर्वी आणि आताचे मिळून एकत्रितपणे ९८ हजार ३०० विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देणार आहेत.

### व्यावसायिकच्या ऑनलाईन परीक्षा

औषधनिर्माणशास्त्र, विधि, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, वस्तुनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन स्वरुपात घेण्यात याव्यात, अशी सूचना परीक्षा मंडळाने या महाविद्यालयांना सोमवारी केली.

पुण्यनगरी

# गतवर्षीपेक्षा ध्वनिपातळींमध्ये वाढ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गतवर्षी २२ मार्च रोजी पुकारलेल्या जनता कर्फ्यूपेक्षा या वर्षीच्या वीकेंड लॉकडाऊनमध्ये ध्वनिपातळी काही प्रमाणात वाढल्याचे समोर आले आहे. ध्वनिपातळी वाढली असली तरी ती निर्धारित आदर्श पातळीपेक्षा खाली होती. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे याबाबतची निरीक्षणे नोंदवली आहेत.

या अभ्यासामध्ये शांतता क्षेत्र, रहिवासी क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्रे अशी चार गटामध्ये

## जनता कर्फ्यू आणि वीकेंड लॉकडाऊनचा तुलनात्मक अभ्यास



वर्गवारी करून त्याचा अभ्यास करण्यात आला. गतवर्षी सीपीआर परिसरात ध्वनिपातळी ४८.४२ होती, तर या वर्षी ती दिवसा ५३.२३, तर रात्री ५१.२० इतकी होती. न्यायालय परिसरात गतवर्षी ध्वनिपातळी ३९.४७ होती, तर या वर्षी दिवसा ४८.८२, तर रात्री ५०.४२ इतकी होती. शांतता क्षेत्रामधील निर्धारित आदर्श पातळी ही दिवसा ५०, तर रात्री ४० इतकी आहे; मात्र सीपीआर परिसरातील पातळी दिवसा व रात्री अशा दोन्ही वेळा अधिक होती. न्यायालय परिसरातील ध्वनिपातळी रात्री अधिक होती. रहिवासी क्षेत्रामध्ये राजारामपुरी, शिवाजी पेठ, उत्तरेश्वर पेठ, मंगळवार पेठ, ताराबाई पार्क, नागाळा पार्क तर व्यावसायिक क्षेत्रामध्ये राजारामपुरी, शाहूपुरी, लक्ष्मीपुरी, मिरजकरी तिकटी, बिनखांबी मंदिर, महाद्वार रोड, गुजरी कॉर्नर, पापाची तिकटी, गंगावेस, बिंदू चौक या ठिकाणांची निरीक्षणे नोंदविण्यात आली. औद्योगिक क्षेत्रामध्ये वाय. पी. पोवारनगर आणि उद्यमनगर या परिसरातील निरीक्षणे नोंदविण्यात आली. पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. आर. भोसले, डॉ. एन. बी. पोखर्णीकर यांच्या मार्गदर्शनाखाली चेतन भोसले, योगेश गलगले, राहुल पाटील, अक्षय पाटील, महेश चव्हाण या विद्यार्थ्यांनी केले.

सकाळ

# वीकेंड लॉकडाउनमध्ये 'आवाज' वाढला

## पर्यावरणशास्त्र विभागाचा सर्व्हे; जनता कर्फ्यूच्या तुलनेत वाढ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : वीकेंड लॉकडाउनमधील दोन दिवसांत शहरातील ध्वनी पातळी गतवर्षीच्या जनता कर्फ्यूच्या तुलनेत अधिक असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने केलेल्या मोजमापातून पुढे आली. निर्धारित आदर्श पातळीपेक्षा ती कमी असल्याने समाधानाची बाब असल्याची प्रतिक्रिया पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी दिली.

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी शासनाने वीकेंड लॉकडाउन जाहीर केले होते. दरम्यान शहरातील महत्त्वाच्या, वर्दळीच्या ठिकाणी पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे ध्वनी पातळीचे मोजमाप केले. गतवर्षी २२ मार्च २०२० ला देशभरात पुकारलेल्या जनता कर्फ्यूवेळी घेतलेल्या ध्वनी पातळीच्या तुलनेत वीकेंड लॉकडॉउनमधील पातळी वाढल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. आर. भोसले, एन. बी. पोखर्णीकर, चेतन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली योगेश गलगले, राहुल पाटील, अक्षय पाटील, महेश चव्हाण यांनी सर्व्हे केला.

| ध्वनी पातळी (डेसिबलमध्ये) | | | |
|---|---|---|---|
| | २०२० | २०२१ | २०२१ |
| | दिवस | दिवस | रात्र |
| **शांतता क्षेत्र** | | | |
| सीपीआर | ४८.४२ | ५३.२३ | ५१.२० |
| कोर्ट | ३९.४७ | ४८.८२ | ५०.४२ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ३६.६१ | ४७.७३ | ४४.२३ |
| शिवाजी विद्यापीठ | ३६.१४ | ३९.६७ | ३७.२९ |
| **रहिवास क्षेत्र** | | | |
| राजारामपुरी | ४६.६१ | ५०.०५ | ४४.२८ |
| शिवाजी पेठ | ४३.८९ | ५२.३६ | ४५.१९ |
| उत्तरेश्वर पेठ | ४३.५४ | ५३.३८ | ४४.५१ |
| मंगळवार पेठ | ५०.५ | ५२.५३ | ४०.२९ |
| ताराबाई पार्क | ३९.११ | ४८.९५ | ४३.७२ |
| नागाळा पार्क | ३९.६७ | ४८.९५ | ४३.७२ |
| **व्यावसायिक क्षेत्र** | | | |
| राजारामपुरी | ४७.४ | ५६.३३ | ४५.५० |
| शाहूपुरी | ४२.६३ | ५३.८९ | ४०.४८ |
| लक्ष्मीपुरी | ४५.५९ | ५३.६३ | ३९.६७ |
| मिरजकर तिकटी | ४५.२५ | ५९.५८ | ४९.१९ |
| महाद्वार रोड | ४४.५९ | ५२.६३ | ४२.१ |
| गुजरी कॉर्नर | ४१.१८ | ५४.५१ | ४५.६० |
| पापाची तिकटी | ४२.४० | ५५.९८ | ५१.४२ |
| गंगावेस | ४३.३६ | ५६.११ | ५१.१८ |
| बिंदू चौक | ४२.३ | ५५.४९ | ४३.८८ |
| **औद्योगिक क्षेत्र** | | | |
| वाय. पी. पोवारनगर | ३५.१० | ५१.४७ | ४१.२ |
| उद्यमनगर | ३५.६१ | ५६.७१ | ४३.६९ |

Times of India

# SUK to hold online exams from April 15

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur will resume the online exams from April 15, the university officials said on Monday. The university had stopped conducting the offline exams since April 6 mainly due to the day-time prohibitory orders.

The university authorities shunned the offline exams and allowed students to opt for online mode for which registration was opened till April 10. There are, however, many who did not opt for online and are planning to write papers offline.

Gajanan Palase, controller of exams of the university said, "The exams scheduled between April 6 and April 12 have been rescheduled, and will now be held April 15 onwards only in online mode. Those who have not opted for online will have to wait for some time."

The university has scheduled exams such that there will be gap between it's exams and exams for HSC and SSC exams, university officials said.

तरुण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. तृप्ती करेकट्टी.

सकाळ

# विद्यापीठात कोरोना केअर सेंटर सुरू

कोल्हापूर, ता. १२ : महापालिकेने शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी (डीओटी) येथे आजपासून पुन्हा कोरोना केअर सेंटर सुरू केले. सावित्रीबाई फुले रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रकाश पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली हे केंद्र सुरू राहणार आहे. दुपारपर्यंत येथे ३३ रुग्ण दाखल झाले, तर दिवसभरात ६० रुग्णांना येथे दाखल करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

शहर आणि जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढत चालल्याने छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, आयसोलेशन हॉस्पिटल, तसेच इतरत्रही रुग्णांची संख्या वाढत आहे. विशेषतः सीपीआरवरचा ताण वाढत आहे. सीपीआरमध्ये केवळ क्रिटिकल रुग्णांवर उपचार करणे सोपे जावे, यासाठी त्या तुलनेत कमी त्रास अथवा केवळ लक्षणे असणाऱ्यांना डीओटीसारख्या युनिटमध्ये शिफ्ट करण्यात येणार आहे. डिओटीत ऑक्सिजनची व्यवस्था आहे. त्याचबरोबर अंडी उबवणी केंद्रातही रुग्णांची व्यवस्था केली जाणार आहे. त्यानंतर जैन बोर्डिंग येथे व्हाईट आर्मीतर्फे दोन दिवसांतच कोरोना केअर युनिट सुरू केले जाईल, या युनिटला नुकतीच प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी भेट दिली होती.



# वीकेंड लॉकडाऊनमध्ये शहरातील ध्वनिप्रदूषणात वाढ

## शिवाजी विद्यापीठाचा निष्कर्ष; जनता कर्फ्यूच्या तुलनेत ध्वनिप्रदूषणाची पातळी वाढली

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गतवर्षी पुकारण्यात आलेल्या जनता कर्फ्यूच्या तुलनेत वीकेंड लॉकडाऊनमध्ये शहरातील ध्वनिप्रदूषणाच्या पातळीत वाढ झाली आहे. वीकेंड लॉकडाऊनमध्ये शहरातील ध्वनिप्रदूषणामध्ये झालेला परिणाम पाहण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने सर्वेक्षण करण्यात आले होते.



वीकेंड लॉकडाऊनमध्ये (दि. १० एप्रिल) शहरातील महत्त्वाच्या वर्दळीच्या ठिकाणांहून ध्वनिप्रदूषणाच्या पातळीचे मोजमाप करण्यात आले होते. शहरातील रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक आणि शांतता क्षेत्रामध्ये जनता कर्फ्यूच्या (२२ मार्च २०२०) तुलनेत ध्वनिप्रदूषणाची पातळी वाढल्याचे विद्यापीठाच्या सर्वेक्षणामधून समोर आले आहे. तर सायलेंट झोन असणाऱ्या सीपीआर परिसरामध्ये ध्वनिप्रदूषणाची पातळी निश्चित मानकापेक्षा अधिक होती. गतवर्षीच्या तुलनेत वीकेंड लॉकडाऊनमध्ये दिलेल्या सवलतींमुळे यंदा काही प्रमाणात ध्वनी पातळीत वाढ झाली आहे.

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, प्रा. डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. आर. भोसले, एन. बी. पोखर्णीकर, चेतन भोसले यांच्या पथकाने हे सर्वेक्षण केले आहे.

### शहरातील ध्वनी पातळीचे सर्वेक्षण

| झोन | ठिकाण | २०२० | २०२१ | झोन | ठिकाण | २०२० | २०२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सायलेंट | सीपीआर | ४८.४२ | ५३.२३ | | लक्ष्मीपुरी | ४५.५९ | ५३.६३ |
| | न्यायालय | ३९.४७ | ४८.८२ | | मिरजकर तिकटी | ४५.२५ | ५९.५८ |
| | जिल्हाधिकारी कार्यालय | ३६.६१ | ४७.७३ | | बिनखांबी | ४४.८० | ५८.३० |
| | शिवाजी विद्यापीठ | ३६.१४ | ३९.६७ | | महाद्वार रोड | ४४.५९ | ५२.६३ |
| रेसिडेन्शियल | राजारामपुरी | ४६.६१ | ५०.०५ | | गुजरी कॉर्नर | ४१.१८ | ५४.५१ |
| | शिवाजी पेठ | ४३.८९ | ५२.३६ | | पापाची तिकटी | ४२.४० | ५५.९८ |
| | उत्तरेश्वर पेठ | ४३.५४ | ५३.३८ | | गंगावेस | ४३.३६ | ५६.९१ |
| | ताराबाई पार्क | ३९.९१ | ४८.९५ | | बिंदू चौक | ४२.०३ | ५५.४९ |
| | नागाळा पार्क | ३९.६७ | ४६.०५ | इंडस्ट्रियल | वाय.पी. पोवारनगर | ३५.१० | ५१.७४ |
| कमर्शिअल | राजारामपुरी | ४७.०४ | ५६.३३ | | उद्यमनगर | ३५.६१ | ५६.७१ |
| | शाहूपुरी | ४२.६३ | ५३.८९ | | | | |

# विद्यापीठाच्या १५ एप्रिलपासून क्लस्टर पद्धतीने महाविद्यालय स्तरावर परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने १५ एप्रिलपासून महाविद्यालय स्तरावर ऑनलाईन स्वरूपात सुरू होणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्रातील अभ्यासक्रमाच्या परीक्षा २२ मार्चपासून क्लस्टर महाविद्यालयामार्फत सुरू करण्यात आल्या होत्या. तथापि, शासन आदेशानुसार कोरोना विषाणू संसर्ग साखळी तोडण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले असल्याने ६ ते १२ एप्रिल या कालावधीतील सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत.

६ ते १२ एप्रिल या कालावधीतील स्थगित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे सुधारित वेळापत्रक क्लस्टर महाविद्यालयांनी पुनश्च: जाहीर करावे. शनिवार व रविवार दोन दिवस लॉकडाऊन जाहीर केलेले असल्याने या दिवशी कोणतीही परीक्षा आयोजित करण्यात येऊ नये, असे परीक्षा विभागाच्या परिपत्रकात म्हटले आहे.

# शिवाजी विद्यापीठ डीओटी वसतिगृहात कोरोना केअर सेंटर सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वाढत्या कोरोना रुग्णांमुळे महापालिकेतर्फे शिवाजी विद्यापीठ येथील डीओटी वसतिगृह येथे ३५० क्षमतेचे कोरोना केअर सेंटर रविवारी सायंकाळपासून सुरू केले असून, या केंद्रात ३६ रुग्ण उपचार घेत आहेत.

प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी शहरातील ४१२९ नागरिकांना लसीकरण केले. सोमवारअखेर ४५ वर्षांवरील ३७ टक्के नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाले. महापालिकेच्या ११ प्राथमिक आरोग्य नागरी केंद्रांमध्ये व शहरातील खासगी हॉस्पिटलमध्ये लसीकरण सुरू आहे. विक्रमनगर येथील भगवान महावीर दवाखाना येथे सोमवारपासून नवीन लसीकरण केंद्र सुरू केले.

फुलेवाडी व महाडिक माळ या आरोग्य केंद्रांमध्ये सर्वाधिक ३९० नागरिकांना लस देण्यात आली. सोमवारपर्यंत आरोग्य कर्मचारी १२,०२०, फ्रंटलाईन वर्कर्स् ७,०८९ व ४५ वर्षांवरील ६६,७१७ नागरिकांना पहिला डोस दिला. तरी ज्या पात्र नागरिकांनी लसीकरण केले नाही. त्यांनी लवकरात लवकर महापालिकेच्या केंद्रांवर अथवा खासगी ठिकाणी लसीरकण करून घ्यावे, असे आवाहन प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी केले.

